IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# बदलत्या ग्राम संस्कृतीचा वेध घेणाऱ्या - सांगावा

**प्रा. लक्ष्मी नरहरी पवार**
सहायक प्राध्यापक
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज.
laxmipawar2009@gmail.com

**सारांश** (Abstract) *: साहित्यामध्ये कथा हा ललित साहित्याचा महत्त्वपूर्ण घटक आहे. मराठी साहित्यामध्ये कथा वाङःमयाला प्राचीन परंपरा आहे. लोकसाहित्य, पुराण वाङःमय, विविध ग्रंथ यातून व्यक्त झालेल्या कथा दिसून येतात. आधुनिक कालखंडात कथा वाङःमय अधिकच विस्तारलेले दिसून येते. 1960 नंतर मराठी साहित्यामध्ये जे विविध प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये या प्रवाह अंतर्गत विविध वाङःमयय प्रकारात कथा विश्व समृद्ध बनत गेले. 1990 नंतर जागतिकीकरणाने समाज व्यवस्थेचा चेहरा मोहरा बदलत गेला. हे विविधांगी बदल कथा विश्वातून साकार झालेले दिसून येतात. 2000 नंतरच्या कालखंडात हे कथा विश्व अधिकतर प्रवाही आणि वास्तवदर्शी बनल्याचे दिसून येते. अनेक समकालीन कथाकारांच्या कथांमधून या जाणिवा व्यक्त झालेल्या दिसतात. या कथाकरांच्या मांदियाळीत प्रकृतीने बहाल केलेल्या विकलांगतेवर यशस्वीपणे मात करत अत्यंत सूक्ष्म संवेदनशील मनाने समाज अवलोकन करून वास्तवालाच कथा विश्वात बंदिस्त करणारा सचिन पाटील नावाचा हा कथाकार म्हणजे एक अवलिया आहे.*

**की - वर्ड :** बदलत्या ग्राम संस्कृतीचा वेध घेणाऱ्या – सांगावा

## I. प्रस्तावना :

साहित्यामध्ये कथा हा ललित साहित्याचा महत्त्वपूर्ण घटक आहे. मराठी साहित्यामध्ये कथा वाङःमयाला प्राचीन परंपरा आहे. लोकसाहित्य, पुराण वाङःमय, विविध ग्रंथ यातून व्यक्त झालेल्या कथा दिसून येतात. आधुनिक कालखंडात कथा वाङःमय अधिकच विस्तारलेले दिसून येते. 1960 नंतर मराठी साहित्यामध्ये जे विविध प्रवाह निर्माण झाले त्यामध्ये या प्रवाह अंतर्गत विविध वाङःमयय प्रकारात कथा विश्व समृद्ध बनत गेले. 1990 नंतर जागतिकीकरणाने समाज व्यवस्थेचा चेहरा मोहरा बदलत गेला. हे विविधांगी बदल कथा विश्वातून साकार झालेले दिसून येतात. 2000 नंतरच्या कालखंडात हे कथा विश्व अधिकतर प्रवाही आणि वास्तवदर्शी बनल्याचे दिसून येते. अनेक समकालीन कथाकारांच्या कथांमधून या जाणिवा व्यक्त झालेल्या दिसतात. या कथाकरांच्या मांदियाळीत प्रकृतीने बहाल केलेल्या विकलांगतेवर यशस्वीपणे मात करत अत्यंत सूक्ष्म संवेदनशील मनाने समाज अवलोकन करून वास्तवालाच कथा विश्वात बंदिस्त करणारा सचिन पाटील नावाचा हा कथाकार म्हणजे एक अवलिया आहे. सचिन पाटील यांचे 'सांगावा' , 'अवकाळी विळखा' , ' गावठी गिच्चा' यासारखे कथासंग्रह रसिक मनाचा ठाव घेणारे आहेत. यापैकी त्यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहाच्या अनुषंगाने येथे विचार मंथन करावयाचे आहे.

## II. उद्दिष्टे

१. 2000 नंतरच्या समकालीन लेखकांमध्ये सचिन पाटील यांचे महत्त्व अधोरेखित करणे.
२. सचिन पाटील यांच्या कथासंग्रहाचे वाङःमयीन मूल्यमापन करून मराठी साहित्यातील 'सांगावा' या कथासंग्रहाचे स्थान निश्चित करणे.
३. समाज परिवर्तनाची दखल घेणारा कथासंग्रह म्हणून 'सांगावा' या कथासंग्रहाचे महत्त्व अधोरेखित करणे.
४. 'सांगावा' या कथासंग्रहाच्या आधारे लेखकाच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेणे.

## III. विषयाची व्याप्ती

सचिन पाटील हे ग्रामीण कथालेखक आहेत. त्यांचा 'सांगावा' , 'अवकाळी विळखा' ,' गावठी गिच्चा' यासारखे कथासंग्रह आहेत. यापैकी 'सांगावा' या कथासंग्रहाचा विविध स्तरावर अभ्यास विचार येथे व्यक्त करावयाचा आहे. प्रस्तुत कथासंग्रहाच्या आधारे ग्रामीण जनजीवनाचे स्वरूप आणि जीवन जगण्याची पद्धती ही गाव पातळीपासून ते देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यक्त करावयाची आहे. आणि भारतीय ग्रामजीवनाचा आलेख या कथासंग्रहाच्या माध्यमातून उलगडावयाचा आहे.

बदलत्या ग्राम संस्कृतीचा वेध घेणाऱ्या - सांगावा

सचिन पाटील लिखित 'सांगावा' हा कथासंग्रह डिसेंबर २००९ मध्ये तेजश्री प्रकाशन कोल्हापूर यांनी प्रकाशित केला. या कथासंग्रहाच्या आजपर्यंत चार आवृत्त्या निघाल्या. या कथासंग्रहामध्ये देशकालपरिस्थितीपरत्वे बदलत्या ग्रामजीवनाचा वेध घेण्यात आला आहे. या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत. या कथांमध्ये विषय विविधता आहे. शिवाय डॉ. शहाजी पाटील यांनी लिहिलेली प्रस्तावना म्हणजे जणू काही या कथासंग्रहाचा आरसाच आहे. लेखकाने हा कथासंग्रह आपली आई सौ. मंगल पाटील यांना अर्पण केला आहे. लेखक सचिन पाटील हे स्वतः शेतकरी कुटुंबातील आहेत शिवाय गावकुस कुटुंबातील आहेत शिवाय शेतशिवार, गावकूस,गावगाडा, ग्रामजीवन या साऱ्यांशी ते परिचित आहेत. हे त्यांचे जीवन अनुभव त्यांच्या 'सांगावा' या कथासंग्रहातून पुरेपूर प्रत्ययाला येतात.

## IV. 'सांगावा' कथासंग्रहातील विषय विविधता

या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत. त्यातील 'सांगावा' ही शीर्षक कथा आहे. सखू म्हातारी परिस्थितीपायी आपल्या मुलाला ऊस तोडणी टोळी बरोबर कामासाठी पाठवते. पण रात्रंदिवस मुलाच्या काळजीचा घोर तिला स्वस्थ बसू देत नाही. तरुण मुलगा, त्यात कमाईचे पैसे हातात पडल्यावर नीट राहील का? संगत चांगली असेल का? व्यसन तर लागणार नाही? या अति काळजीच्या घोराने ती शेवटी येसाबाई करवी, "जसा असशील तसा आत्ताच्या आत्ता निघून ये म्हणावं" असा सांगावा धाडते. 'भूल' या कथेत हणमा शेतकऱ्याला शेताची भूल पडते. हाता तोंडाला आलेले वांग्याचे पीक अंधश्रद्धेला बळी पडून उपटून फेकतो. 'काळीज' या कथेतून दोन पिढ्यांमधील संघर्ष तर 'पाहुणा' या कथेतून ऐनवेळी आलेल्या पाहुण्याचा समाचार पण त्याचा न झालेल्या पाहुणचार सांगितलेला आहे. 'मांडवझळ' या कथेतून लाली नावाच्या पाळीव कुत्रीची कथा आहे. मुक्या प्राण्यांच्या भावना, संवेदना, दया यांचे प्रतिनिधित्व ही कथा करते. 'वाट' या कथेत शेतकऱ्याच्या नशिबी आजही वनवास असल्याची खंत आहे. तर 'धग' या कथेतून संभा इस्त्रीवाल्याची व्यथा वेदना मांडली आहे. 'मरणकळा' मधील आदर्श शिक्षक इंद्रजीत वाघमारे यांच्या माध्यमातून शिक्षकांची होणारी कुचंबना तर 'सय' या कथेतून गाव खेड्यातील माणसांचे प्रेम, जिव्हाळा, ओढ याबरोबर बालहट्ट, प्रौढपणा यावर लेखकाने भाष्य केले आहे. 'चकवा' ही खेड्यातील प्रेमाचा चकवा देणारी कथा आहे. गाव पांढरीचे 'ओझं' उराशी बाळगणाऱ्या रणजीत काकडे यांची कथा आहे. सावकाराच्या पोराच्या अत्याचाराला बळी पडलेल्या आशीची कथा म्हणजे 'बळी' होय.

### कथेच्या अभिव्यक्तीचे स्वरूप

लेखक हा ग्रामीण भागातून. त्यात शेतकरी कुटुंबातून असल्यामुळे ग्रामीण जीवनातील संवेदनशीलता अनुभव आणि व्यवहार यांची सांगड या कथानकाच्या अभिव्यक्तीत दिसून येते. कथा रचनेचा घाट योग्य त्याच परीने साकारला आहे. आशया भोवती गुरफटणारी पात्रं, वातावरण, संवाद, भाषा अशी वलये कथेला उठावदारपणा आणतात. त्यात सुसंगताता येते. मात्र काही नाविन्यपूर्ण बाबी रचनात्मक तंत्रात दिसून येतात. नव्या जुन्या संगमाच्या हिंदोळ्यावर फुललेली कथा म्हणजे 'सांगावा' कथासंग्रह होय.

## V. कथानक आणि व्यक्तिचित्रण

या कथासंग्रहात अवतरणाऱ्या प्रत्येक कथेतील व्यक्तिमत्व हे बाह्यांगानेच नव्हे तर अंतरंगाने ही उलगडले असल्याचे दिसते. श्रमाला महत्त्व देणारी, माणूसपण जपणारी, संस्कृतीचे जतन व संवर्धन करणारी, भूतदया अंगीकारणारी गाव खेड्यातील ही संस्कृती कथेमध्ये वरवरपणे साकारत नाही तर कथेमधून अवतरणारी पात्रे, त्यांचे संवाद आणि सभोवतालचे वातावरण हे त्या कथात्मकतेला विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवते. सामान्यातील सामान्य माणसापासून ते सावकारापर्यंतच्या हर एक व्यक्तीच्या चेहरा मोहरा या कथानकातून समोर येतो आणि नायकाचे व्यक्तिमत्व उलगडते. सुखदुःखाच्या संवेदनांबरोबर विविध क्षेत्रातील बदलामुळे जगण्यासाठी करावी लागणारी यातायात स्पष्ट झाली आहे. आपले परकेपणाच्या छटांबरोबर जगण्यावर नितांत प्रेम करणारी माणसं, प्रामाणिकपणाचा गंध लाभलेली माणसं या कथेतून समोर येतात.

IJARSCT

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology

International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal

ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

## VI. भाषाशैली

लेखक ज्या समाजव्यवस्थेत घडतो, वाढतो त्याच समाजव्यवस्थेची भाषा, अनुभव, व्यवहार तो ग्रहण करतो आणि साहित्यात शब्दांकित करतो. लेखकाची ही भाषिक जाण त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीतून होत असते. या कथासंग्रहात साधी सोपी, सहज संवाद साधणारी बोलीभाषा आहे. वर्णनाच्या ओघात ही भाषा प्रवाही राहते आणि वाचकांचा ठाव घेते. अनुभव सापेक्ष, परिस्थिती सापेक्ष जे जे काही अनुभवले तेच लेखकाने मांडले आहे. ग्रामीण बोलीतील अनेक शब्द नवेपणा साकारतात. इकून (विकून), ग्वॉड (चांगलं), टकुऱ्यावर (डोक्यावर) कावून कातावून (वैतागून) असे अनेक शब्द तर अनेक म्हणी, वाक्प्रचार, पात्रांच्या मुखातून सहजतेने येतात. उदा. - चकत्या पिटत बसणे, भिड चेपल्यागत होणे, भाकरीचा पिट्टा घुमविला, 'हे मेलेलं कातडं आणि आपण जिवंत कातडं एवढाच फरक नाही तर दोघांचा जीणं सारखंच' , 'झेंडवाच टप्पोर फूल वाऱ्यावर झुलावं तशी मान झुलवत हासणे' इत्यादी अनेक. याशिवाय गाव खेडूताची जीवन विषयक धारणा स्पष्ट होते.

## VII. प्रसंग आणि वर्णनात्मकता

घटनेला साजेसा प्रत्येक प्रसंग आला असून प्रसंगाला साजेशी वर्णन लेखक करतो. यातून चित्रमयता नजरेसमोर उभी राहते. बोली भाषेचा ढंगदारपणा आणि नादमय शब्दयोजना यामुळे हे प्रसंग उठून दिसतात आणि वाचक गुंतून राहतो. 'पावणा' कथेत पाहुणा बिन चहाचा जाताच नवरा बायको कुढत राहतात. 'चकवा' कथेत जोरदार वळीव पावसाला सुरुवात होते तर 'मरणकळा' या कथेत इंद्रजीत वाघमारे वडिलांचा जीव गेल्यानंतरच घरी येतात. प्रत्येक कथेत असे उठावदार प्रसंग की जे काळजाचा ठाव घेतात. तशी वर्णनशैली देखील आहे.

## VIII. समारोप

अडचणीच्या संघर्षाच्या काळात हार न मानता जगण्याची जिद्द, चिकाटी मनात धरून वाटचाल करणाऱ्या पिढीची ही कहाणी आहे. ही जिद्द, चिकाटी मुळात लेखकाच्या मनकुंचल्यातून साकारली आहे. अवतीभवतीचे निरीक्षण आणि त्याला अनुभवांची जोड हे सचिन पाटील यांच्या कथांचे विशेष आहे. जीवन ही एक झुंज आहे आणि जगणे हे क्रमप्राप्त आहे अशा दोन सबळ गोष्टीवर कथानकाची भिस्त आहे आणि ती यशस्वी देखील झाली आहे.

## IX. निष्कर्ष

1) गाव खेड्यातील नष्ट होऊ पाहणाऱ्या मूल्य संस्कृतीकडे लेखक वाचकांचे लक्ष वेधतो आणि लोकसंस्कृती, लोकसंकेत यांच्या संवर्धनासाठी सूचकता दाखवतो

2) कथा विश्वातील विविधता लेखकाचे निरीक्षणशक्ती, सूक्ष्म संवेदनशीलता यांचा प्रत्यय देते.

3) जागतिकीकरणाच्या प्रवाहात समाज परिवर्तनाने होऊ घातलेले बदल वाचकांच्या निदर्शनास येतात.प्रसंगानुरूप वातावरण, संवाद आणि वर्णने आली आहेत. निवेदनातील सहजता, सांगण्यातील

4) रसिकता, प्रसंग उभी करण्याची धाटणी वाखाणण्याजोगी असून नवपरिवर्तनाचा ध्यास आहे.

5) प्रश्नाच्या गाभ्याला हात घालणारी लेखणी, जातीय चित्रणांचे स्वरूप तर कधी नात्यातीलविणलेले बंध यांचा उलगडा करताना परिवर्तनवादी बुद्धीवादी लेखकाची मूल्य दृष्टी लक्षात येते.

## संदर्भ ग्रंथ

1) सांगावा - सचिन वसंत पाटील, तेजश्री प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती चौथी

2) बदलत्या ग्रामसंस्कृतीचा वेध – सांगावा – संपा. डॉ. श्रीकांत पाटील, तेजश्री प्रकाशन कोल्हापूर, आवृत्ती पहिली

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in

DOI: 10.48175/IJARSCT-37523